स्थापना २८ ऑगस्ट १९८९

"एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ"

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

नोंदणी क्र. टिएन्ए/युएलआर/आरएसआर/(सीआर)/ ३७४ / सन ८९-९०

कार्यालय
३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर,
अंबरनाथ (पूर्व). जि. ठाणे - ४२१ ५०१.

सहकारात ऐपतीपेक्षा पतिला महत्व आहे.

शुभ चिंतावे
शुभ इच्छावे
वचनी शुभ बोलावे
शुभकार्याच्या
सामर्थ्याने करावे
जीवनाचे सोने

आठवा वार्षिक अहवाल
सन १९९६-९७

ऑडिट वर्ग अ

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

संचालक मंडळ

१)	श्री. जयवंतराव बंडू काटकर	:	अध्यक्ष
२)	श्री. अविनाश नारायण खानविलकर	:	उपाध्यक्ष
३)	श्री. हणमंत सदाशिव घनवट	:	सेक्रेटरी
४)	श्री. भीमराव यशवंत सूर्यवंशी	:	खजिनदार
५)	श्री. अशोक तुकाराम चौधरी	:	संचालक
६)	श्री. भगवान अर्जून उतेकर	:	संचालक
७)	सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव	:	संचालक
८)	श्री. प्रकाश शंकर पवार	:	संचालक
९)	श्री. शंकरराव केशवराव दरेकर	:	संचालक
१०)	सौ. आसराबाई आ. महांडुळे	:	संचालक
११)	श्री. मनोहर पांगळू जाधव	:	संचालक
१२)	सौ. मंगला श्रीधर ढाले	:	संचालक

अंतर्गत हिशोब तपासनीस

श्री. विजय अमृत पाटील
(बि. कॉम, जी. डी. सी . अँड ए.)

श्री. लालासो रामचंद्र पवार
बी. कॉम

कायदेशीर सल्लागार

ॲडव्होकेट - श्री. सुहास गडकरी, कल्याण

कर्मचारी वृंद

श्री. नाथा बाबुराव लोटके श्री. रत्नलाल दादासो घनवट
श्री. आनंदा विठ्ठल पाटील

बँकर्स

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
शाखा अंबरनाथ, जि. ठाणे.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

सभेची नोटीस

श्री. महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढीच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १३ ऑगस्ट ९७ रोजी ठीक दुपारी ३-०० वाजतां ब्राह्मण सभा हॉल (दत्त मंदीर)वडवली, अंबरनाथ (पूर्व) येथे आयोजित केली आहे तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी वेळेवर हजर राहून सहकार्य करावे. ही विनंती.

सभेपुढील विषय

१) अध्यक्षांची निवड
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) दि. ३१ मार्च १९९७ रोजी संपणाऱ्या सकारी वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकांस मंजूरी देणे.
४) दि. ३१ मार्च ९७ रोजी संपणाऱ्या सहकारी वर्षाच्या नफा विभागणी पत्रकास मंजुरी देणे.
५) शासकीय लेखा परिक्षकांचा सन ९५-९६ अहवाल वाचून व त्यास मंजुरी देणे.
६) अंतरगत लेखा परिक्षकांचा सन ९६-९७ अहवाल वाचून व त्यास मंजुरी देणे.
७) सन ९७-९८ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड व त्यांचे मानधन टरविणे.
८) सन ९७-९८ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
९) पोटनियम दुरूस्तीस मान्यता घेणे.
१०) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.

दिनांक २५ जुलै ९७

श्री. हणमंत सदाशिव घनवट
सेक्रेटरी

विशेष सुचना

१) पुरेशा गणसंखेअभावी तहकूब झालेली सभा अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी त्याच विषयांवर बोलविण्यात येईल त्यास गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना कामकाजाविषयी प्रश्न अगर सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी त्या ५ ऑगष्ट ९७ पूर्वी संस्थेच्या कार्यालयात पाठवाव्यात.
३) सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.
४) सर्व सभासदांनी सन ९४-९५ आणि ९५-९६ चा लाभांश घेतला नसल्यास तो घेऊन जावा. अन्यथा तो राखीव निधित जमा केला जाईल.

"विना सहकार नही उद्धार "

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

आठवा वार्षिक अहवाल

सन १९९६-९७

सन्माननीय सभासद बंधू, भगिनिंनो,

सप्रेम नमस्कार

आपल्या संस्थेचा आठवा वार्षिक अहवाल, ताळेबंध व नफा-तोटा पत्रके आणि संस्थेच्या आर्थिक वाटचालीचा आढावा आपल्या समोर ठेवतांना मला आणि माझ्या संचालक मंडळास अत्यंतिक आनंद वाटतो.

'सहकार' म्हणजे एकसंघटीत, एक जिवाने बरोबर राहून काम करणे. समाजातील विविध घटकांशी एकत्रित राहून परस्परांच्या उत्कर्षासाठी प्रामाणिक सहकार्य केल्यानेच समाज रचना निकोप व निरोगी बनते; आणि हीच प्राथमिक गरज आहे.

खरे तर सहकाराची समाजातील प्रत्येक थरांमध्ये आवश्यकता असते पण आर्थिक दूर्बल घटकांमध्ये याची प्रकर्षाने जाणीव होत असते. एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या इच्छेने व अहंगडाने पछाडलेली व्यक्ती सहकारामध्ये अपायकारक ठरते. सहकारी भांडवलावर चालविल्या जाणाऱ्या संस्थाचा व्यवहार नि:स्वार्थी, काटेकोर व श्रमिक सहकाराने चालणे आवश्यक असते.

राष्ट्राच्या जडणघडणीत नागरी सहकारी संस्थांचे अनन्यसाधारण महत्तव असते. सभासदांचा आर्थिक विकास घडविणे. त्यांना काटकसरीची, बचतीची व सहकाराची सवय लावणे ही नागरी संस्थांची उद्दिष्टे असतात. त्या दृष्टीने पतसंस्था आर्थिक सबल व सक्षम असणे अत्यावश्यक असते. म्हणून सभासदाने घेतलेले कर्ज मुदतीत परतफेड करणे अत्यंत गरजेचे आहे.

असा प्रामणिक सभासदच आपले, आपल्या कुटुंबाचे, आपल्या संस्थेचे पर्यायाने आपल्या राष्ट्राचे हित साधण्यास हातभार लावीत असतो. याची सुज्ञ सभासदांनी नोंद घ्यावी.

आपल्या संस्थेने केलेली यशस्वी वाटचाल व प्रगती ही आपणा सभासद बंधू-भगिनींना अभिमानास्पद अशीच आहे. संस्थेने अत्यंत सामान्य स्थिती असलेल्या सभासदांना उपलब्ध निधितून वेळेत मागणीनुसार कर्जवाटप केले आहे. तेव्हा कर्जदाराने कर्तव्य-भावनेने आपले कर्ज थकबाकी न करतां मुदतीत भरून सहकार्य केले आहेच. याचा मी संस्थेच्या वतीने ऋणी आहे.

"एकमेका सहाय्य करूं। अवघे धरूं सुपंथ" या म्हणी प्रमाणे सर्व सभासदांनी, ठेवीदारांनी व हितचिंतकांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा करून आणि आपला प्रतिसाद गृहीत धरून आपण सारे नववर्षाचे स्वागत करूया.

धन्यवाद.

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष
संचालक मंडळाचे वतीने.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

प्रगती दृष्टीक्षेप

ठेवी:- ठेवी हा पतसंस्थेचा कमा आहे. आपली संस्था या भक्कम कण्यावर उभी असून कोणतेही बँक कर्ज न घेता प्रगती पथावर वाटचाल करते आहे. अहवालसाली संस्थेकडे एकूण ठेवी रू.५,२५,७१५.०० जमा आहेत.

कर्ज :- सस्था सभासदांच्या अडिअडचणी लक्षांत घेऊन वेळोवेळी क़र्ज पुरवठा करीत असते. सभासदांना काटकसर, बचतीची सवय अंगी बाणवून सहकार वाढीस लावण्याच्या भावनेने संस्थेने अहवालसाली रू. १८,५३,०००/- इतके कर्जवाटप केले आहे.

नफा :- संचालक मंडळाने अविश्रांत कष्ट घेऊन चालू सहकार वर्षात संस्थेस एकूण रूपये १,५०,००० इतका नफा मिळवून दिला आहे.

सभा :- अहवालसाली संस्थेच्या एकूण १२ सभा झाल्या. तसेच सभासदांच्या अडिअडचणींचा विचार करणेसाठी संचालक सायंकाळी ७ ते ९ संस्थेत उपलब्ध असतात.

श्रध्दांजली :- अहवालसाली संस्थेचे सेक्रेटरी हणमंत सदाशीव घनवट यांचे वडील, श्री. महादेव सावळा हिरवे यांच्या मातोश्री श्री. कृष्णाजी यशवंतराव यांच्या मातोश्री व बंधू, सभासद श्री. सिताराम ना. उतेकर यांचे चिरंजीव, संचालिका सौ. मंगला ढाले यांच्या मातोश्री अशा ज्ञात अज्ञानांच्या निधनाबद्दल संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली.

आभार :- सिडकोचे माजी अध्यक्ष श्री. नकुल पाटील, श्री. दादासाहेब नलावडे, ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक अंबरनाथ शाखेचे व्यवस्थापक व कर्मचारी वृंद; लेखा परिक्षक श्री. बी. आर. पाटील साहेब, श्री. देशमुख, श्री. गोसावी साहेब, व कर्मचारी, मेकॉन इंजिनियरिंग कंपनीचे मॅनेजर, अंतरगत लेखा परिक्षक, श्री. विजय अमृत पाटील, श्री. लालासाहेब रामचंद्र पवार तसेच संस्थेचे सभासदांनी कर्तव्य भावनेने प्रेरित होऊन जे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार व धन्यवाद.

ऋणनिर्देष

मा. श्री. बाळासाहेब सोनजे, मुख्याध्यापक महात्मा गांधी विद्यालय, मा. श्री. रामराव मोरे मुख्याध्यापक भाऊसाहेब परांजपे विद्यालय अंबरनाथ, तसेच संस्थेचे ठेवीदार, हितचिंतक यांचे व संस्थेच्या उत्कर्षासाठी अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तिंचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे; त्या सर्वांना धन्यवाद देऊन अशीच सहकार्याची व मार्गदर्शनाची विनम्र प्रार्थना प्रदर्शित करून, हा अहवाल व हिशोबांची पत्रके आपल्या संमतीसाठी सादर करीत आहे.

धन्यवाद!

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

हे नुतन वर्ष सर्व सभासद बधुभगिनी, ठेवीदार व हितचिंतकांना सुखासमृध्दीचे जावो. ही सदिच्छा!

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

संस्थेची ठळक वैशिष्टये

सभासद संख्या	७७०

१)	वसूल भाग भांडवल	१०,८४,०००.००
२)	अहवालसाली कर्जवाटप	१८,५३,०००.००
३)	मुदत ठेव जमा	२,२२,३००.००
४)	दैनंदीन ठेव जमा ५,२५,५१५	२,९३,०१५.००
५)	मासीक ठेव जमा	१०,२००.००
६)	गुंतवणूक	८७,४००
७)	निर्वळ नफा	१,५०,०००.००
८)	वार्षिक उलाढाल	२०,८९,७५५.००
९)	लाभांश सुचित	१०%

सेवा वैशिट्ये

विनम्र आणि सुलभ सेवा

वैयक्तीक व तारण कर्ज योजना

सभासदांना १८% दराने वेळेत कर्जपुरवठा

मुदत ठेवीवर आकर्षक १५% व्याज

दैनंदीन व मासिक ठेव योजना

४ वर्ष ९ महिन्यात

दामदुप्पट योजना

संस्थेने कोणत्याही बँकेचे कर्ज घेतलेले नाही.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

नोंदणी क्र. टिएन्ए/युएलआर/आरएसआर/(सीआर)/ ३७४ / सन ८९-९०

तेरीज पत्रक नंबर १

दिनांक १/४/९६ ते ३१/३/९७

जमा	रक्कम रूपये	नावे	रक्कम रूपये
आरंभीची शिल्लक रोख	१,१५३	भाग भांडवल खाते	२५,७७०
बँक	२९,३२३	कर्ज खाते	९,७६,५००
भाग भांडवल	१,८९,६९०	दैनंदीन ठेव खाते	२,५६,४३३
कर्ज खाते	८,१९,६९६	ठेवीवर दिलेले व्याज	३८,८१७
व्याज खाते	२,८२,४०१	प्रवास खर्च	१,९१७
दैनंदिन ठेव खाते	४,८०,०९५	छपाई व लेखन साहित्य	७,९९५
छपाई व लेखन साहित्य	८७१	दैनंदीन ठेव तारण कर्ज	३,७२,१७०
बँक व्याज जमा	६९	मासीक ठेव खाते	१०,३५०
दैनंदीन ठेव तारण कर्ज	१,४५,९५०	वार्षिक अकोटींग फी	१,०००
मासीक ठेव खाते	१२,८५०	मुदत ठेव खाते	१,१७,९००
ठेवीवरील व्याज जमा	७,३९२	ठेवीवरील कमिशन	१२,७९७
मुदत ठेव खाते	१,६७,२००	किरकोळ खर्च	९,११८
ठेवीवरील कमिशन	४७६	टेलीफोन खर्च	५६३
अनामत खाते	१,८००	पोस्टेज खर्च	३३८
लाभांश खाते	४०	कर्मचारी वेतन	२६,७००
नोटीस फी वसूल	३८०	बँक चार्जेस	११६
इमारत निधी	१४०	अनामत	१,२००
प्रवेश फी	१४३	लाभांश वाटप	७७,७९५
		सभासद भेट वस्तू	३९,०००
		वा. स. साधारण सभा खर्च	२,५३२
		शिक्षण निधी	१,६००
		सभासद कल्याण निधी	९००
		कार्यालय डिपॉझिट	२०,०००
		जाहिरात खर्च	३५०
		फर्निचर खाते	७४,६८०
		ऑफिस भाडे	१,८००
		कर्मचारी बोनस	२,४००
		ऑडिट फी	२,५९५
		अखेरची शिल्लक रोख	३,८९८
		बँक	५२,३५५
एकूण	२१,३९,६६९	एकूण	२१,३९,६६९

श्री. भीमराव यशवंत सूर्यवंशी — खजिनदार

श्री. हणमंत सदाशिव घनवट — सचिव

श्री. जयवंतराव बंडू काटकर — अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

नोंदणी क्र. टिएन्ए/युएलआर/आरएसआर/(सीआर)/ ३७४ / सन ८९-९०

- उत्पन्न - खर्च पत्रक नंबर - २ -

रक्कम ९५-९६	खर्च तपशील	रक्कम ९६-९७	रक्कम ९५-९६	उत्पन्न तपशील	रक्कम९६-९५
११,८१४.००	छपाई व लेखन साहित्य	७,१२४	७,७२५	ठेवीवरील व्याज	७,३९२
२,७२६.००	किरकोळ खर्च	९,११८	२,३५,९०८	सभासद कर्जावरील व्याज	२,८२,४०१
१,००९.००	प्रवास खर्च	१,९१७	५०५	बँक व्याज	६९
६९६.००	पोस्टेज व टेलीग्राम	३३८	४०	बँक लाभांश	४०
३४,५५०.००	कर्मचारी वेतन	२६,७००	७३७	नोटीस फी	३८०
२,११०.००	वा. स. साधारण सभा खर्च	२,५३२	३९६	दैनंदीन ठेव कमिशन	४७६
- - -	बँकेचे चार्जेस	११६			
३,६००.००	ऑफिस भाडे	३,६००			
२,६००.००	जाहीरात खर्च	३५०			
३,५७४.००	दैनंदीन ठेवीवरील कमिशन	१२,७९७			
५६२.००	टेलीफोन खर्च	५६३			
७५६.००	झीज खाते	८,१४८			
४,११०.००	देणे संचालक सभा भत्ते	४,०५०			
२,४००.००	देणे अंतर्गत हिशोब तपासणीस फी	२,४००			
२६,३८१.००	देणे ठेवीवरील व्याज	५४,२१७			
४,८००.००	देणे कर्मचारी बोनस	६००			
२०,०००.००	देणे सभासद भेट वस्तू	- - -			
२,६००.००	देणे ऑडीट फी	३,०८५			
१,६००.००	देणे शिक्षण निधी	२,०९०			
२६६.००	निवडणूक खर्च	- - -			
१०००.००	देणे अकौंटींग चार्जेस	१,०००			
१,१८,१३२.००	निव्वळ नफा	१,४९,९३३			
२,४५,२८६.००	एकूण रूपये	२,९०,७५८	२,४५,२८६.००	एकूण रूपये	२,९०,७५८

श्री. भीमराव यशवंत सूर्यवंशी
खजिनदार

श्री. हणमंत सदाशिव घनवट
सचिव

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

नोंदणी क्र. टिएन्ए/युएलआर/आरएसआर/(सीआर)/ ३७४ / सन ८९-९०

नफा विभागणी पत्रक

सन १९९६-९७

अनु.	तपशील	नफा विभागणी रक्कम	एकूण नफा रक्कम
१	नफा मागील शिल्लक नफा १५५.०० चालू सालचा नफा १,४९,९३३.००		१,५०,०८८.००
२	२५% राखीव निधी	३७,४८३.००	
३	लाभांश समिकरण निधी	१०००.००	
४	इमारत निधी	१०००.००	
५	सभासद कल्याण निधी	५००.००	
६	संशयीत बुडित कर्ज निधी	१०००.००	
७	धर्मदाय निधी	५००.००	
८	लाभांश १०%	१,०८,४९९.००	
९	शिल्लक नफा	१०६	
	एकूण रूपये	१,५०,०८८.००	१,५०,०८८.००

श्री. भीमराव यशवंत सूर्यवंशी — खजिनदार
श्री. हणमंत सदाशिव घनवट — सचिव
श्री. जयवंतराव बंडू काटकर — अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी

नोंदणी क्र. टिएन्ए/युएलआर/आरएसआर/

ताळेबंद पत्रक नंबर ३

रक्कम ९५-९६	कर्ज व देणी		रक्कम ९६-९७
१०,००,०००.००	अधिकृत भाग भांडवल		१०,००,०००.००
९,२१,०७०.००	वसूल भाग भांडवल -		१०,८४,९९०.००
१,०३,६०१.००	राखीव निधी	१,०३,६०१.००	१,३३,५२७.००
	प्रवेश फी	१४३.००	
	सन ९५-९६ मधील	२९,७८३.००	
१,०९,७३४.००	इतर निधी -		१,१४,४७४.००
	इमारत निधी	४९,०१५.००	
	लाभांश समिकरण निधी	१७,८१६.००	
	धर्मदाय निधी	९,७१३.००	
	सभासद कल्याण निधी	८,६१५.००	
	संशयीत व बुडित कर्जनिधी	२१,८१५.००	
	रौप्य महोत्सव निधी	७,५००.००	
२,५०,२५३.००	ठेवी -		५,२५,७१५.००
	मुदत ठेव	२,२२,३००.००	
	दैनंदीन ठेव	२,९३,०१५.००	
	मासीक ठेव	१०,२००.००	
	बचत ठेव	२००.००	
९१,४३०.००	देणी व तरतुदी -		८०,९६१.००
	देणे ठेवीवरील व्याज	४२,४००.००	
	देणे ऑडीट फी	३,०९०.००	
	देणे शिक्षण निधी	२,०९०.००	
	देणे कर्मचारी बोनस	३,०००.००	
	देणे भेट वस्तू	१,०००.००	
	देणे लाभांश	१९,५३१.००	
	देणे अनामत	६००.००	
	देणे अकौंटींग चार्जेस	१,०००.००	
	देणे ऑफीस भाडे	१,८००.००	
	देणे अंतरगत हिशोब तपासणी फी	२,४००.००	
	देमे संचालक सभा भत्ता	४.०५०.००	
१,१८,३३४.००	नफा - तोटा खाते -		१,५०,०८८.००
	मागील शिल्लक नफा	१५५.००	
	चालू नफा	१,४९,९३३.००	
१५,९४,४२२.००	एकूण रूपये		२०,८९,७५५.००

श्री. भीमराव यशवंत सूर्यवंशी
खजिनदार

श्री. हणमंत सदाशिव घनवट
सचिव

पतपेढी मर्यादित

(सीआर)/ ३७४ /

दिनांक ३१ मार्च ९७

रक्कम ९५-९६	जिंदगी व येणे		रक्कम ९६-९७
१,१५३.००	रोख शिल्लक		३,८९८.००
२९,३२३.००	ठाणे जिल्हा मद्यवर्ती सह. बँक शिल्लक		५२,३५५.००
८७,४००.००	गुंतवणूक		८७,४००.००
	ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक शेअर्स	१००.००	
	राखीव निधी - मुदत ठेव	७,३००.००	
	मुदत ठेव	८०,०००.००	
	कर्ज		
१४,५१,४४२.००	सभासद दिर्घमुदत कर्ज		१६,०८,२४६.००
१८,३००.००	दैनंदीन ठेव तारण कर्ज		२,४४,५२०.००
६,८०४.००	फर्निचर व फिक्चर		७३,३३६.००
	मागील	६,८०४.००	
	खरेदी	७४,६८०.००	
	एकूण	८१,४८४.००	
	झीज १० टक्के,	८,१४८.००	
	कार्यालय डिपॉझिट		२०,०००.००
१५,९४,४२२.००	एकूण रूपये		२०,८९,७५५.००

श्री. जयवंतराव बंडू काटकर

अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

नोंदणी क्र. टिएन्.ए/युएलआर/आरएसआर/(सीआर)/ ३७४ / सन ८९-९०

अंदाज पत्रक

सन १९९७-९८

जमा तपशील	अंदाजे उत्पन्न	खर्च तपशील	अंदाजे खर्च
सभासद कर्जावरील व्याज	३,१५,०००	छपाई व लेखन साहित्य	९,०००.००
प्रवेश फी	१००	किरकोळ खर्च	१,०००.०० (हस्तलिखित: १०,०००.००)
बँक लाभांश	१५	प्रवास खर्च	२,०००.००
बँक व्याज	१०,०००	टपाल खर्च	५००.००
		वा. स. साधारण सभा खर्च	३,५००.००
		संचालक भत्ता	४,५००.००
		सरकारी हिशोब तपासनीस फी	३,०००.००
		शिक्षण निधी	२,०००.००
		कर्मचारी वेतन	४०,०००.००
		अंतर्गत हिशोब तपासनीस मानधन	२,४००.००
		जाहीरात खर्च	२,०००.००
		ठेवीवरील व्याज	५०,०००.००
		ऑफीस भाडे	९५,०००.००
		सचिव मानधन	३,०००.००
		भाग परत	२५,०००.००
		नफा अंदाजे	१,५८,२९५.०० (हस्तलिखित: ९५८२९५.००)
एकूण रूपये	३,२५,११५.००	एकूण रूपये	३,२५,११५.००

श्री. भीमराव यशवंत सूर्यवंशी — खजिनदार

श्री. हणमंत सदाशिव घनवट — सचिव

श्री. जयवंतराव बंडू काटकर — अध्यक्ष

सभासदांना सूचना

१) आपल्या पत्त्यात झालेला बदल संस्थेस लेखी स्वरूपात द्यावा.
२) सभासदास वारस नेमता येतो. ज्या सभासदांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी ती करून द्यावी व भविष्यातील अडचणी टाळाव्यात.
३) आपली पत व पतसंस्थेचा दर्जा वाढविण्यासाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरावेत. तसेच भाग वर्गणी भरून संस्थेस सहकार्य करावे व त्याचा फायदा लाभांश रूपाने मिळवावा.
४) पतपेढीचे काम सहकारी कायदे व अधिनियमास अनुसरून करावे लागते. तेव्हा आपल्या काही अडचणी असल्यास त्या समजावून घेऊन संस्थेस सहकार्य करावे.
५) कर्ज घेण्यासाठी विश्वासु तिघांचा गट करा व तो गट सहसा बदलू नका.
६) संस्थेकडून केवळ कर्ज घेणे हा उद्देश न ठेवता आपल्या मिळकतीतून बचत करा व संस्थेत ठेव ठेवा. ठेवीवर आकर्षक द. सा. द. शे. १५ऽ व्याज मिळवा.
७) सभासद झाल्यापासून सहा महिन्यानंतरच तो कर्ज मागणीस आणि जमिनदार रहाण्यास पात्र ठरतो.
८) कर्ज मंजुरीसाठी अर्जदार व दोन जामिनदारांची पगार पत्रके (उत्पन्नाचे दाखले) आवश्यक रहातील.
९) प्रत्येक सभासद फक्त दोन कर्जदारांना जामिन राहू शकतो.
१०) कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ३६ हप्त्यात करावी लागेल.
११) कर्ज घेतेतवेळी कर्जदाराने दोन्ही जामिनदारासह संस्थेच्या कार्यालयांत हजर रहाणे आवश्यक आहे.
१२) कर्जाचे हप्ते व भाग वर्गणी भरतेवेळी आपले पास बुक त्वरित भरून घेणे.
१३) वार्षिक स. सा. सभेत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित केला आहे तरी ज्या सभासदांची मुले मार्च ९७ मध्ये झालेल्या १० वी व १२ वी च्या परिक्षेत उत्तीर्ण झाली असतील त्यांची नावे त्यांच्या प्रमाण पत्रासह संस्थेच्या कार्यलयात दिनांक ५/८/९७ अखेर नोंदवावीत.

संस्थेची उद्दीष्टे

१) सभासदांमध्ये सहकाराची भावना रूजवून त्यांच्यामध्ये प्रामाणिकपणा, काटकसर, बचतीची भावना जागृत करून स्वावलंबी जीवन जगण्यास उध्दुक्त करणे.
२) सभासदांना त्यांच्या संकटकाळी मदतीचा हात देऊन त्यास आपत्तीतून बाहेर काढणे.
३) सभासदांना वेळोवेळी सहकार्य करून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करणे.
४) सभासदांमध्ये अल्पबचतीची भावना वाढीस लावून त्याच्या भविष्यातील अडचणीवर मात करण्यास हातभार लावणे.
५) वाजवी शर्थीवर विनाविलंब कर्ज मिळवून देणे.
६). वरील उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी इतर कामे हाती घेणे.

जयहिंद!

जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

पोट नियम दुरूस्ती

पोट नियम	सद्याचे पोट नियम	पोट नियम दुरुस्ती	दुरूस्तीचे कारण
क १.२	भाग भांडवल संस्थेचे अधिकृत भाग - भांडवल रूपये १००००००/- असेल. सदर अधिकृत भाग भांडवल निबंधकांच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ट परवानगीने वाढविण्यास मुभा राहील. प्रत्येक भागाची किंमत १०/- रूपये राहील. ती रक्कम एका रकमेने भरली पाहिजे.	संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रूपये २००००००/ असेल. सदर अधिकृत भाग भांडवल निबंधकाच्या वेळोवेळी घेतलेल्या विशिष्ट परवानगीने वाढविण्यास मुभा राहील. प्रत्येक भागाची किंमत १०/- रूपये राहील. ती रक्कम एका रकमेने भरली पाहिजे.	अधिकृत भाग भांडवलाची मर्यादा संपत आल्यामुळे
नवीन	नाममात्र सभासदत्व देणे	कोणत्याही इसमास जो अंबरनाथ शहरातील रहिवासी असेल त्यास संस्थेमध्ये दैनंदिन ठेव, मासीक ठेव आणि बचत खाते चालू करता येईल. त्यास १/- रूपये प्रवेश फी भरून नाममात्र सभासद होता येईल.	संस्थेची कार्यपध्दती पाहून लोकांमध्ये वाढत असलेला उत्साह पाहून त्यांना नाममात्र सभासद करण्यास अडचण येऊ नये म्हणून.
नवीन	नाममात्र सभासदांचे अधिकार	१) नाममात्र सभासदास संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहता येणार नाही. २) त्यास संस्थेच्या कोणत्याही निवडणुकीत भाग घेता येणार नाही. तसेच मतदान करता येणार नाही. ३) नाममात्र सभासद हा कोणत्याही संस्थेचा सभासद वा थकबाकीदार असता कामा नये. ४) अशा सभासदास संस्थेस खोटी निवेदने देणे, सतत थकबाकीदार असणे कायद्याने अपात्र असणें, त्याने हेतूपुरत्सररित्या संस्थेच्या लौकिकास हानीकारक कृत्ये केल्यास व इतर अशा कृत्यांमुळे त्याच्या ठेवी जप्त करण्याचे व प्रसंगी हकालपट्टी करण्याचे अधिकार संस्थेस रहातील. ५) नाममात्र सभासदाच्या मृत्यूनंतर त्याने नेमून दिलेल्या वारसास त्याचे हक्क प्राप्त होतील. ६) ठेवीवरील व्याज दर ठरविण्याचे अधिकार संस्थेच्या व्यवस्थापक समितीस (संचालक मंडळास) रहातील.	संस्थेस कोणत्याही कायदेशीर अडचणी येऊ नयेंत व त्यामुळे संस्थेंचा दूलौकिक होऊ नये म्हणून.

पोटनियम दुरूस्ती

पोट नियम	सद्याचे पोट नियम	पोट नियम दुरूस्ती	दुरूस्तीचे कारण
फ १.२	१) स्थावर मिळकतीच्या गहाणवटीवर रू. २५०००/- पर्यंत कर्ज देता येईल. परंतु अशा स्थावर मिळकतीची किंमत कर्ज दिलेल्या रकमेच्या दुप्पीटीपेक्षा कमी असता कामा नये. अशा स्थावर मिळकतीच्या सर्व प्रकारच्या धोक्यासाठी विमा उतरविला पाहिजे. आणि त्यावरच व्यवस्थापक समितीच्या संमतीने ऋणको सदस्यांच्या वैयक्तीक जामिन (Security) घेतला पाहिजे. २) रूपये १००००/- पर्यंतच्या कर्जाऊ रकमा व्यवस्थापक समितीने संमत केलेल्या दोन सदस्यांच्या वैयक्तीक जामिनावर देता येतील. ३) तातडीचे कर्ज रू. १०००/- पर्यंत १० महिनेपेक्षा कमी मुदतीसाठी देता येतील.	१) स्थावर मिलकतीच्या गहाणवटीवर रू. २५०००/- पर्यंत कर्ज देता येईल. परंतु अशा स्थावर मिळकतीची किंमत कर्ज दिलेल्या रकमेच्या दुपटीपेक्षा कमी असता कामा नये. अशा स्थावर मिळकतीच्या सर्व प्रकारच्या धोक्यासाठी विमा उतरविला पाहिजे, आणि त्यावरच व्यवस्थापक समितीच्या संमतीने ऋणको सदस्यांचा वैयक्तिक जामीन (Security) घेतला पाहिजे. २) रूपये २००००/- पर्यंतच्या कर्जाऊ रकमा व्यवस्थापक समितीने संमत केलेल्या दोन सदस्यांच्या वैयक्तिक जामिनावर देता येतील. ३) तातडीचे कर्ज रू. १०००/- पर्यंत १० महिनेपेक्षा कमी मुदतीसाठी देता येतील.	वाढत्या महागाई मुळे सभासदांच्या गरजा भागविणे सोईचे व्हावे म्हणून.

पोटनियम दुरूस्ती

पोट नियम	सद्याचे पोट नियम	पोट नियम दुरूस्ती	दुरूस्तीचे कारण
नवीन	नाममात्र सभासद कर्ज - - -	१) नाममात्र सभासदास त्याच्या दैनंदिन/मासिक/मुदत ठेवीच्या तारणावर कर्ज देता येईल. २) असे कर्ज दैनंदिन/मासिक/ मुदत ठेव जमा रकमेच्या ४ पट किंवा रू. २५०००/- पर्यंत यापैकी जे कमी असेल ती रक्कम नाममात्र सभासदांची आर्थिक क्षमता पाहून देता येईल. ३) दैनंदिन/मासिक/मुदत ठेवींच्या तारण कर्जावरील व्याज दर उपविधी क्र. फ. १-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रहातील. ४) अशा तारण कर्जास एक किंवा दोन नाममात्र सभासदांचे जामीन घेऊन कर्ज देता येईल.	नाममात्र सभासदांच्या आडीअडचणी भागविता येण्यास सुलभ व्हावे.अशा सभासदास बचतीची सवय व्हावी म्हणून.
ह. २-१	अध्यक्ष/ चिटणीस/ व्यवस्थापक समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या समितीच्या सदस्यांस स्वत:जवळ रू. ५००/- पेक्षा अधिक अगर नोंदणी अधिकाऱ्याची पूर्व मंजुरी घेऊन अधिकार दिल्या गेलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम रोख बाकी म्हणून ठेवता येणार नाही. संस्थेच्या रोख रकमेच्या ताब्याची जबाबदारी अंगावर असलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी उपयुक्त मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या रकमा बँकेत अगर सर्वांत अधिक जवळ असलेल्या (त्या बँकेच्या) शाखेत ताबडतोब भरून टाकल्या पाहिजेत.	अध्यक्ष किंवा चिटणीस किंवा व्यवस्थापक समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या समितीच्या सदस्यास स्वत: जवळ रू. १०००/- पेक्षा अधिक अगर नोंदणी अधिकाऱ्याची पूर्व मंजुरी घेऊन अधिकार दिल्या गेलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम रोख बाकी म्हणून ठेवता येणार नाही. संस्थेच्या रोख रकमेच्या ताब्याची जबाबदारी अंगावर असलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी उपयुक्त मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या रक्कमा बँकेत अगर सर्वात अधिक जवळ असलेल्या (त्या बँकेच्या) शाखेत ताबडतोब भरून टाकल्या पाहिजेत.	सभासदांच्या गरजा भागविता याव्यात तसेच वाढत्या महागाईमुळे काही किरकोळ खर्च करणे सुलभ व्हावे म्हणून.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, (पू.) जि. ठाणे.

आंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेल्या सन १९९६–९७ च्या तेरीज, नफा-तोटा पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती माहिती व खुलासे उपलब्ध करून दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरून संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरण पत्रांशी जूळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हांला देण्यांत आलेल्या खुलाशावरून हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : १ जून १९९७

आंतर्गत हिशोब तपासणीस

१) **श्री. विजय अमृत पाटील**
बी. कॉम. जी. डी. सी, अण्ड ए.

२) **श्री. लालासाहेब रामचंद्र पवार**
बी. कॉम

BOOK-POST

प्रेषक -

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादीत

अंबरनाथ, जि. ठाणे.

३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर,
अंबरनाथ (पू.) जि. ठाणे.